MHAH090024572022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०६/१०/२०२२ |
| नोंदणी दिनांक | : | ०६/१०/२०२२ |
| निकाल दिनांक | : | ०७/०३/२०२४ |
| कालावधी | : | ०१ ०५ ०१<br>वर्षे महिने दिवस |

**संगमनेर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी : पी. आर. पालवे )**

**नियमित फौजदारी खटला ५२६/२०२२**

**निशाणी -३९**

**भाग- अ**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन व्दारा,<br>संगमनेर तालुका पोलीस स्टेशन, संगमनेर<br>गु. र. क्रमांक I २७१/२०२२ |
| **अभियोग पक्षाकरिता मा. विधीज्ञ** | सहा.सरकारी अभियोक्ता<br>श्री. आर. व्ही. शेळके |
| **आरोपी** | १. अमोल भिकाजी चव्हाण, वय ३५ वर्षे<br>२. पारुबाई भिकाजी चव्हाण, वय ६५ वर्षे<br>३. महादेव राघु चव्हाण, वय ५८ वर्षे<br>४. शालन महादेव चव्हाण, वय ५१ वर्षे<br>सर्व रा.पेमगिरी ता. संगमनेर जि. अ.नगर |
| **आरोपीकरिता मा. विधीज्ञ** | श्री. एस. एस. वर्पे. |

**भाग - ब**

| | |
|---|---|
| **गुन्हयाचा दिनांक** | ३०/०१/२०२२ ते दिनांक १५/०५/२०२२ |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | ०५/०७/२०२२ |
| **दोषारोपपत्र दिनांक** | ०६/१०/२०२२ |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | २३/०२/२०२३ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | ०५/०७/२०२३ |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक** | लागू नाही |

| | |
|---|---|
| **न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक** | ०७/०३/२०२४ |
| **शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास** | लागू नाही |

## <u>आरोपीचा तपशील</u>

| **आ. क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक केल्याचा दिनांक** | **जामीनवर सुटल्याचा दिनांक** | **दोषरोप कलम** | **निर्दोषमुक्त / शिक्षा** | **दिलेली शिक्षा** | **फौजदारी प्रकिया संहिता कलम ४२८ नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला न्यायाधीन बंदी कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अमोल भिकाजी चव्हाण | निरंक | निरंक | भारतीय दंड संहिता कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली | निरंक | निरंक |
| २. | पारुबाई भिकाजी चव्हाण | निरंक | निरंक | वरील प्रमाणे | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली | निरंक | निरंक |
| ३. | महादेव राघु चव्हाण | निरंक | निरंक | वरील प्रमाणे | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली | निरंक | निरंक |
| ४. | शालन महादेव चव्हाण | निरंक | निरंक | वरील प्रमाणे | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली | निरंक | निरंक |

## भाग क

## अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | पुष्पा अमोल चव्हाण | फिर्यादी | २८ |
| २ | सुभाष किसन जेजुरकर | साक्षीदार | ३० |
| ३ | दत्तात्रय गोविंद दिघे | तपासी अंमलदार | ३२ |

## भाग ड

## अभियोग पक्षातर्फे सादर झालेला दस्तपुरावा

| अ.क्र. | वर्णन | निशाणी |
|---|---|---|
| ०१ | फिर्याद | २९ |
| ०२ | तपासाचा लेखी आदेश | ३३ |
| ०३ | भरोसा सेलचे पत्र | ३४ |

## :: न्यायनिर्णय ::

(सुपुर्दगी दिनांक ०७/०३/२०२४)

०१) आरोपींविरुध्द कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ भारतीय दंड विधान संहिता अन्वये दोषारोप आहे.

## अभियोग पक्षाचे संक्षिप्तरित्या कथन असे आहे की,

०२) फिर्यादी सौ. पुष्पा अमोल चव्हाण रा. पेमगिरी ता. संगमनेर हिने पोलीस ठाणे येथे समक्ष फिर्याद दिली की, दिनांक ३०/०१/२०२२ रोजी ती तिच्या सासरी नांदण्याकरिता तिचे सास-यानी घेवुन ठेवलेल्या घरी जुन्नर ता. पुणे येथे गेली. तिचे पती नामे अमोल चव्हाण हे युको मारुती व्हॉन चालवुन त्यांचा उदरनिर्वाह करततात. फिर्यादीच्या लग्नानंतर तिच्या पती, सासु व दिर यांनी तिला सासरी जुन्नर येथे दिड महिना चांगले नांदविले. त्यानंतर, आरोपी क्र. १ हा म्हणाला की, माझे एल.एल.बी. झालेले असून, आपण मुळगावी पेमगिरी येथे

जाउ व संगमनेर येथे भाडयाने खोली घेवु, तु तेथे वकील व्यावसाय कर असे म्हणाला. त्यामुळे, आरोपींसोबत ती पेमगिरी येथे आली. त्यानंतर, आरोपी क्र. १ म्हणाला की, संगमनेर येथे भाडयाने रूम घेण्यासाठी तु तुझे आई वडीलांकडून १०,०००/- रूपये घेवुन ये त्यावेळी, ती तिच्या आई वडीलांकडून वरील नमूद रक्कम घेवुन आरोपी क्र. १ ला दिली. परंतु, आरोपी क्र. १ ने भाडयाने रूम न घ ेता पेमगिरी येथे मुळ गावी गेला. त्याठिकाणी चुलत सासरे महादेव चव्हाण व चुलत सासु शालन यांच्या समवेत एकत्र राहिलो. परंत, दोन ते तीन दिवसांनंतर आरोपी क्र. १ व सासु, सासरे काही एक बोलत नव्हते. तसेच, त्यांना काही विचारले की, आरोपी क्र. १ दारू पिवुन मला शिवीगाळ करून मारहाण करीत असे. तसेच, सासु तिला जेवन देत नव्हती. तसेच, फिर्यादीला दवाखान्यात उपचाराकामी नेले नाही.

०४) फिर्यादीने पुढे असे कथन केले की, फिर्यादी माहेरी नांदत असतांना, गाडी घेण्यासाठी ५०,०००/- हजार रूपयांची मागणी करून आरोपींनी तिला शिवीगाळ व लाथाबुक्यांनी मारहाण करून, जिवे मारण्याची धमकी देवुन उपाशी पोटी ठेवले. म्हणून फिर्यादीने आरोपींविध्द फिर्याद दिली.

०५) प्रस्तुत फिर्यादीवरुन तालुका पोलीस स्टेशन ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे गु.र.नं.I २७१/२०२२ कलम ४९८(अ), ३२३, ५०४ आणि ५०६ सह कलम ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे गुन्हा नोंदवून तपास पोलिस नाईक श्री. डी. जी. दिघे, तालुका पोलिस स्टेशन यांच्याकडे दिला. त्यांनी प्रकरणातील साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवून घेतली. आरोपींना समजपत्र दिले. प्रकरणाच्या तपासामध्ये आरोपींकडुन घटना घडल्याचे निष्पन्न झाल्यावर तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०६) आरोपी न्यायालयात हजर झाल्यावर निशाणी क्र.११ वर आरोपींविरुध्द कलम ४९८(अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ भारतीय दंड विधान संहिता प्रमाणे दोषारोप निश्चित केले व ते त्यांच्या बोलीभाषेत त्यांना वाचून व समजावून सांगितले. आरोपींनी त्यांचे निवेदन अनुक्रमे निशाणी क्र.१२

ते १५ वर गुन्हा केल्याचे स्पष्ट शब्दात नाकारले व संपरीक्षेची मागणी केली. साक्षीदाराच्या पुराव्यात आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने आरोपींचे **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३** नुसार निशाणी ३३ ते ३६ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

०७) या कामी प्रामुख्याने खालील निर्धारण बिंदू माझे विचारार्थ उपस्थित झाले असुन, त्यावरील न्यायनिष्कर्ष मी कारणेमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **निर्धारण बिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | प्रस्तुत आरोपी यांनी त्यांचे समान हेतुच्या पृष्ठयर्थ फिर्यादी व आरोपी क्र.1 यांच्या लग्नानंतर दिनांक ३०/०१/२०२२ ते दिनांक १५/०५/२०२२ या कालावधी दरम्यान फियादीने तिचे माहेरुन गाडी घेण्यासाठी ५००००/- घेवुन यावे अशी बेकायदेशीर मागणी करुन त्यासाठी तिला मारहाण व शिवीगाळ करून तिचा छळ केला आणि त्याव्दारे भारतीय दंड विधानाचे कलम ४९८(अ) सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही** |
| २) | उपरोक्त नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी प्रस्तुत आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुरस्सरणार्थ फिर्यादीस मारहाण केली आणि त्याव्दारे भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| | सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | |
| ३) | उपरोक्त नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी प्रस्तुत आरोपींनी त्यांच्या समान हेतुच्या पुरस्सरणार्थ फिर्यादीस शिवीगाळ करुन तिच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने तिला प्रक्षोभीत करुन तिचा अपमान केला आणि त्यायोगे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नाही** |
| ४) | काय आदेश? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**:: <u>कारणमिमांसा</u> ::**

**<u>निर्धारण बिंदू क्र. १ ते ३ बाबत</u> :-**

०८) निर्धारण बिंदू क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याने कारणमिमांसेची पुनरावृत्ती होवू नये म्हणून त्यांचा एकत्रितपणे विचार करण्यात आला आहे.

०९) आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ फिर्यादी - पुष्पा अमोल चव्हाण हिची साक्ष निशाणी क्र.२८ वर नोंदविलेली असून, तिने असे कथन केले आहे की, आरोपी नं. १ हा तिचा पती असुन आरोपी नं. २ ही तिची सासु आहे. आरोपी नं. ३ तिचा चुलत सासरा व आरोपी क्र. ४ ही तिची चुलत सासु आहे. तिचा विवाह ३०.०१.२०२२ रोजी कानुर

पठार येथील गारगुंडी येथील शांताबाई फापाळे मंगलकार्यालयामध्ये झाला होता. त्यानंतर ती तिच्या पतीसह जुन्नर येथे नांदावयास गेले. ती नांदायला गेल्यानंतर दीड महिना आरोपींनी तिला व्यवस्थीत नांदवले. त्यानंतर आरोपी क्र. १ म्हणाला की आपण आपले गाव पेमगीरी येथे जावु. तसेच संगमनेर येथे भाडयाने खोली घेवुन आपण तेथे राहु. आरोपी क्र. १ च्या म्हणण्याप्रमाणे ते पेमगिरीला आले. त्यानंतर आरोपींनी तला पेमगिरी येथेच ठेवले. तेथे असतांना तिने आरोपींना सागितले की तिचे विधी शाखेमध्ये पदवी झाली असल्याने तुला वकिली व्यवसाय करायचा आहे. त्यावेळी, आरोपींनी तिला दार बंद करून घ ारामध्ये ठेवुन तिला काम करु देत नव्हते.

१०) फिर्यादीने तिच्या सरतपासात पुढे असे कथन केले की, दिनांक. २५.०३.२०२२ रोजी ती आजारी असल्यामुळे तिने आरोपींना दवाखान्यात नेण्याची विनंती केली असता आरोपींनी तिच्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे, तिने तिच्या वडिलांना फोन करून बोलवुन घेवुन तिचे वडील तिला पेमगिरी येथे आले व मला घेवुन माझया माहेरी गेले. त्यानंतर तिने आरोपी क्र. १ ला वारंवार फोन केल्यानंतरही त्यांनी फिर्यादीचा फोन उचलत नव्हता. त्यानंतर ४ ते ५ दिवसांनी तिने आरोपी क्र. १ ला घेवुन जाण्याबाबतची विनंती केली असता, आरोपी क्र. १ म्हणाले की तु मला लागत नाहीस.

११) फिर्यादीने पुढे कथन केले की, पेमगिरी येथे दि. ०१.०४.२०२२ रोजी गेल्यानंतर तिला आरोपी क्र. १ म्हणाले की तु येथे कशासाठी आलीस तु मला लागत नाहीस असे म्हणुन आरोपी क्र. १ ने तिला शिवीगाळ केली. त्यावेळी, ती म्हणाली की, तुम्ही मला जुन्नर येथे ठेवुन घ्या त्यावेळी, आरोपी क्र. १ म्हणाला की, तुला ठेवुन घेणार नाही. म्हणून ती संध्याकाळी जुन्नर येथील घरी गेली असता तेथे तिची सासु राहात होती. त्यावेळी, सासु तिला म्हणाली की हे घर तिच्या नव-याचे आहे तु येथे राहायचे नाही. त्यामुळे तिने जुन्नर येथील पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली की तिला तिचे सासरकडील लोक घरात ठेवुन घेत

नाहीत.

१२) फिर्यादीने पुढे कथन केले की, पोलीसांनी तिच्या सासुला पोलीस स्टेशन येथे बोलवुन घेतले असता, तिची सासु जुन्नर पोलीस स्टेशनला हजर होवुन तिने पोलीसांना सांगितले की, ती फिर्यादीला आरोपी क्र. १ कडे नेवुन सोडील. त्यानंतर, ती जुन्नर येथील सासुच्या घरी गेले. त्यानंतर तिच्या सासुने गाडी बोलवुन घेतली व तिला पतीकडे पेमगिरी येथे आणुन सोडले. त्यावेळी, ती पेमगिरी येथे गेल्यानंतर तिच्याशी कोणीही बोलत नव्हते. त्यावेळी, आरोपी तिला बोलले की तुला पैसे आणण्यासाठी माहेरी पाठवले होते. तु पैसे का आणले नाही. ती आरोपी क्र. १ च्या घरी पेमगिरी येथे राहात असतांना आरोपी दारू पिउन आला व तिचा गळा धरून मारहाण केली. तसेच तिला घरामेध्ये कोंडुन ठेवुन तिचा मोबाईल काढुन घेतला व आरोपींनी तिला ८ दिवस जेवण दिले नसल्याचे तिने कथन केले आहे.

१३) त्यानंतर जुन्नर वरून पेमगिरी येथे आल्यानंतर आरोपी क्र. १ एका महिलेला घरामध्ये घेवुन आला होता. त्या महिलेबददल तिने विचारणा केली असता आरोपीने तिला काहीही माहिती दिली नाही. तसेच आरोपी क्र. १ तिला म्हणाले की मला ही महिला लागते तु लागत नाही. आरोपींनी तिच्याकडे गाडी घेण्यासाठी रू. ५०,०००/- रूपयांची मागणी केली.

१४) सदर साक्षीदाराने उलट तपासामध्ये मान्य केले की, फिर्यादीने संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात स्वत: स्वाक्षरी करून, तक्रार नोंदविली होती. तसेच, पोलीसांनी सांक्षीदारांचा जबाब दिनांक ०५/०७/२०२२ रोजी नोंदविला होता. तसेच, तिने तिचा विवाह गारगुंडी येथे स्व. शांताबाई फापाळे येथे झाल्याचे सांगितले. तसेच, साक्षीदाराचा इतर उलट तपास पाहिला असता, असे दिसून येते की, तिने तिच्या जबाबामध्ये अनेक सुधारणा केल्या असून, त्या तिने सरतपासामध्ये नमूद केल्या आहेत. परंतु, ते तिच्या जबाबामध्ये नमूद नाहीत. तसेच, ती पुढे कथन करते की, आरोपी क्र. १ ने तिच्याकडे ५०,०००/- रूपये

मागितल्या बाबतची तारीख वार व महिना सांगु शकत नसल्याचे तिने मान्य केले आहे. तसेच, तिने हेही मान्य केले की, आरोपींना समजुन सांगण्यासाठी आरोपींच्या घरी बैठक बसविली होती  हे उत्तरे सोडता साक्षीदाराने तिने तिच्या जबाबामध्ये सरतपासामध्ये सर्व सुधारणा मान्य केलेल्या आहेत. तसेच, तिने इतर उत्तर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत.

१५) अभियोग पक्षातर्फे फिर्यादीस साहय करण्यासाठी साक्षीदार क्र. २ सुभाष जेजुरकर यांची साक्ष अभिलेखावर नोंदविण्यात आली. सदर साक्षीदाराने सरतपासामध्ये असे कथर करतो की, तिचा विवाह आरोपी क्र. १ सोबत दिनांक ३०/०१/२०२२ रोजी शांताबाई फापाळे मंगलकार्यालय गारगुंडी येथे झाला होता. त्याने एक तोळयाचे लॉकेट बक्षीस दिले होते. साक्षीदाराने फिर्यादी व आरोपी क्र. १  च्या विवाहात संसारउपयोगी वस्तु देवुन थाटामाटात विवाह लावुन दिला होता. विवाह प्रसंगी दोनशे ते अडीशे लोक उपस्थित होते. विवाहनंतर फिर्यादीला त्यांच्या मुळ गावी घेवुन आरोपी नांदण्यासाठी गेले. त्यानंतर, फिर्यादी व आरोपी क्र. १ हे जाणे-येण्यासाठी म्हणून वेळ जातो म्हणून संगमनेर येथे खोलीस आगाउ रक्कम म्हणुन १०,०००/- रूपये दिले होते. त्यानंतर त्यांनी संगमनेरमध्ये खोली घेतली नाही व फिर्यादीला पेमगिरी येथे आरोपी क्र. १ सोबत सासरी, चुलत सासु, सासु, व सासरे यांच्या सोबत नांदत होती. त्यानंतर फिर्यादी आजारी पडली म्हणून तिला भेटण्यासाठी ते पेमगिरी येथे गेले होते. त्यानंतर त्यांनी तिला दवाखान्यामध्ये घेवुन जाण्यासाठी कान्होरे येथे गेले. अशावेळी, आरोपी क्र. १ यास साक्षीदाराने फिर्यादीस नांदण्यास घेवुन जाण्याबाबत सांगितले असता, आरोपीने फिर्यादीला नांदण्यासाठी घेवुन गेले नाहीत. त्यामुळे, साक्षीदाराने स्वत: फिर्यादीस नांदण्यासाठी पाठविले होते. त्यानंतर, साक्षीदार हे पुन्हा कान्होर पठार येथे गेले असता, त्यांना फिर्यादीचा फोन आला व आरोपी हे तिला मारहाण करून पैशाची मागणी करीत आहेत, असे

सांगितले. अशावेळी, साक्षीदार फिर्यादीस पुन्हा माहेरी घेवुन गेले व त्यानंतर पुन्हा फिर्यादी हिस कान्होरे येथे घेवुन गेले. अशावेळी, त्यांनी पुन्हा नातेवाईकांशी बैठक बसविली असता, आरोपींनी फिर्यादीस नांदविणार नाही असे स्पष्ट सांगितले.

१६) सदर साक्षीदार उलट तपासात मान्य करतो की, ते अ.नगर येथे पोस्ट खात्यामध्ये कार्यरत होते. संजना ही त्यांची पत्नी असून, साहेबराव हे भाउ आहेत. उलटतपासादरम्यान साक्षीदार सर्व उत्तर सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे देतो.

१७) अभियोग पक्षास साहय करण्यासाठी सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०३ तपासी अंमलदार पोहेकॉ. डी.जी. दिघे यांनी सरतपासामध्ये कथन केले की, दिनांक ०५/०६/२०२२ रोजी त्यांची नेमणुक तालुका पोलीस ठाणे येथे पोलीस नाईक या पदावर होती. सदर दिवशी त्यांना गु. र. नं. २७१/२०२२ चा तपास लेखी आदेशान्वये दिला. तसेच त्यांना आदेशासोबत फिर्याद, दैनिक अहवाल, लग्न पत्रिका, फिर्यादी व आरोपी क्र. १ च्या आधार कार्डच्या छायांकित प्रती, भरोसा सेल येथुन आलेल्या पत्राची मुळ प्रत मिळाली. त्यानंतर त्यांनी साक्षीदारांचा जबाब नोंदविला व आरोपीस गुन्हया बददलचे समजपत्र दिले. आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याने त्यांनी दोषारोपपत्र दाखल केले. साक्षीदाराने उलटतपासादरम्यान असे कथन केले की, त्यांनी फिर्यादीचा जबाब नोंदविलेला नाही. तसेच, खटल्यातील सर्व साक्षीदार हे फिर्यादीचे नातेवाईक असून, ते सर्व ऐकीव माहितीवर घेतलेले साक्षीदार आहेत. सदर साक्षीदाराने सर्व उत्तर सुचक प्रश्नांना नकार्थी उत्तरे दिली.

१८) आरोपींतर्फे विद्वान वकील यांनी युक्तिवाद केला की, साक्षीदारांनी त्याच्या जबाबामध्ये ब-याच प्रमाणामध्ये सुधारणा केल्या आहेत.

तसेच, साक्षीदार क्र. २ हा स्वतंत्र साक्षीदार नसून, तो स्वारस्य असणारा साक्षीदार आहे. आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होण्यासाठी कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकीलांनी युक्तिवाद केला की, उपलब्ध पुरावा अभिलेखावर आणलेला आहे.

१९) भारतीय दंड विधान कलम ४९८(अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये दंडनीय असलेला दोषारोप अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द शाबीत केला आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी उपरोक्त नमुद तोंडी पुराव्याचे, अभिलेखावर दाखल असलेल्या कागदोपत्री पुराव्याच्या व परस्पर विरोधी युक्तिवादाच्या अनुषंगाने अवलोकन करणे आवश्यक आहे.

२०) भारतीय पुरावा कायद्याच्या तरतुदीप्रमाणे फिर्यादीचा वापर हा फिर्याद देणाऱ्या व्यक्तीच्या साक्षीला पुष्टी देण्यासाठी अथवा विसंगती आधोरेखीत करण्यासाठी केला जातो. फिर्याद ही आरोपी विरुध्दचे दोषारोप शाबीत करण्यासाठी भक्कम किंवा ठोस पुरावा म्हणून ग्राहय धरता येत नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोगपक्षाने जरी फिर्याद शाबीत केली असली तरी, पुराव्याचे अवलोकन केले असता, असे स्पष्ट दिसून येत आहे की, तिच्या साक्षीमध्ये ब-याच सुधारणा करीत ती स्वत:च्या साक्षीवर ठोस उभी राहिलेली नाही.

२१) प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीने अभियोग पक्षाच्या हकीकतीशी विसंगत कथने केल्यामुळे तिचा अभियोग पक्षातर्फे उलट तपास घेण्यात आला असता उलटतपासादरम्यान फिर्यादमधील मजकुराबाबत तिने ब-याच सुधारणाही मान्य केलेल्या आहेत. परंतु अभियोग पक्षाच्या हकीकतीस पुष्टी देईल अशी कोणतीही बाब सदर उलट तपासादरम्यान अभिलेखावर आली नाही. तसेच, साक्षीदार क्रमांक २ याने देखील त्याचा जबाब नोंदविला असला तरी, त्याने त्याच्या साक्षीदमध्ये ब-यापैकी सुधारणा केल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये अभियोग पक्षाला मदत होईल असे काहीही आल्याचे दिसून येत

नाही.

२२) उपरोक्त नमुद तोंडी पुराव्याच्या अवलोकनावरुन हे स्पष्ट होते की, अभियोग पक्षाची हकीकत ही अभियोग साक्षीदारामार्फत म्हणजेच स्वत: पिडीत व्यक्तीमार्फत शाबीत करण्यास अभियोग पक्षाला अपयश आलेले आहे. तसेच अभियोगपक्षातर्फे कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर शाबीत झालेला नाही.

२३) सबब, उपरोक्त नमुद कारणमिमांसेवरुन हे स्पष्ट होते की, आरोपी यांनी त्यांचे समान हेतुच्या पृष्ठयर्थ फिर्यादी व आरोपी क्र.१ यांच्या लग्नानंतर दिनांक ३०/०१/२०२२ ते दिनांक १५/०५/२०२२ या कालावधी दरम्यान फियादीने तिचे माहेरुन गाडी आणण्यासाठी रक्कम रूपये ५०,०००/- घेवुन यावे अशी बेकायदेशीर मागणी करुन त्यासाठी तिला मारहाण व शिवीगाळ करून तिचा छळ केला. तिचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने तिला प्रक्षोभीत करुन तिचा अपमान केला. याबाबी नि:संशयपणे सिध्द करण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे हे स्पष्ट होते. **सबब, मी निर्धारण बिंदु अनुक्रमे १ ते ३ च्या उत्तरादाखल नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.**

**निर्धारण बिंदू क्र. ४ बाबत :-**

२४) निर्धारण बिंदू क्र.१ ते ३ यांची कारणमिमांसा लक्षात घेतली असता अभियोग पक्षाला आरोपींविरुध्द ठेवलेले दोषारोप नि:संशयपणे शाबीत करण्यास अपयश आले आहे. सबब, प्रस्तुत आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. **करीता निर्धारण बिंदु क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.**

**:: <u>आदेश</u> ::**

१) आरोपी १ ते ४ यांची भारतीय दंड विधान संहिता कलम ४९८(अ), ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम **४३७-अ** अन्वये मा. अॅपेलेट कोर्ट येथे हजर राहण्याकरीता रूपये १५,०००/-(अक्षरी पंधरा हजार रूपये मात्र) चे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र आणि जामीनबंध दयावे जे सहा महिने कालावधीकरीता वैध राहिल.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.

PRACHI RADHAKISAN PALWE

Digitally signed by PRACHI RADHAKISAN PALWE
Date: 2024.03.07 18:19:16 +0530

(पी. आर. पालवे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. ४) संगमनेर

दिनांक : ०७/०३/२०२४